MHKO070002462018

# विशेष दिवाणी दावा नं. ५/२०१८ मधील नि.३९ वरील आदेश

१. सदरचा अर्ज हा प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, सह कलम १५१ अन्वये दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यत वादींनी हेरवाड येथील गट नं. ५५ पैकी १ हे. ३७ आर. (ज्याचे सविस्तर वर्णन अर्जाच्या परिशिष्टमध्ये दिलेले आहे व त्याचा उल्लेख यापुढे दावा मिळकत असा केला आहे.) या मिळकतीवरील प्रतिवादींच्या ताब्यास हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्यासाठी प्रतिवादींनी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीच्या नि.क्र. ३९ मधील अर्जातील हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

प्रतिवादीचे पुर्वहक्कदार मयत रावसाहेब पाटील यांनी २००८ च्या दिवाळी मध्ये गावातील पंच रावसाहेब नरसगोंडा पाटील व आप्पासाहेब पुनगोंडा पाटील यांच्यासमक्ष दावा मिळकतीत वाटप वाटप करुन घरातील सर्व हिस्सेदारांना वाटून दिलेली आहे. सदर वाटपाप्रमाणे ४० आर. इतकी मिळकत प्रतिवादी नं. १ यांना वाटपात दिलेली आहे. तसेच ३७ आर. इतकी मिळकत प्रतिवादी नं. २ व प्रतिवादी नं. ३ व ४ यांना प्रत्येकी ३० आर. मिळकत वाटून दिलेली आहे. त्या झालेल्या वाटपाचे दि. २०/५/२०१८ रोजी स्मरणपत्र लिहून ठेवलेले आहे. त्या स्मरणपत्रावर रावसाहेब पाटील व सर्व प्रतिवादीच्या व पंचाच्या आहेत. वादी हे दावा मिळकतीमध्ये गरज भासेल तेव्हा कामासाठी येत होते. मयत रावसाहेब यांनी बॅकेकडून व सोसायटीकडून घेतलेले कर्ज भरलेले नव्हते. त्या

कर्जाची रक्कम उसबीलातून वसूल करण्याची भाषा सोसायटीने केल्यामुळे मयत रावसाहेब यांनी विश्वासाने वादीच्या नांवे कारखान्यास उस पाठविला होता. रावसाहेब यांनी वादीच्या हक्कात कोणताही करार करुन दिला नाही व करार करुन देण्याचा त्यांना अधिकारही नव्हता. वादी हे प्रतिवादीच्या मालकीचे पीक पळवून नेण्याच्या विचारात आहेत. शेतातील उस तोडून नेण्याची त्यांनी धमकी दिली आहे त्यामुळे प्रतिवादींनी सदर अर्जाद्वारे तुर्तातुर्त मनाई हुकुम मागीतलेला आहे.

३. नि.क्र. ४० वर वादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व मजकूर नाकारलेला आहे. वादींच्या कथनानुसार रावसाहेब व त्यांच्या वारसांमध्ये कधीही वाटप झालेले नाही व त्याचे स्मरणपत्रही लिहून ठेवलेले नाही. रावसाहेब हे २०१७ सालीच मयत झालेले आहेत. दावा मिळकत ही साठेखत कराराने वादीच्या ताब्यात असून २०१० पासून उसदेखील त्यांच्याच नांवे गेलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादींचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी व प्रतिवादींचे म्हणणे विचारात घेता अर्जाच्या निकालासाठी पुढीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात व त्या मुद्दावर मी कारणमिमांसे आधारे पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी त्यांच्या हक्कात सकृतदर्शनी केस असल्याचे सिध्द करतात काय ? | ... नकारार्थी. |
| २. | सोयीस्करतेची तुला प्रतिवादीचे बाजूने आहे काय ? | ... नकारार्थी. |
| ३. | दाव्यात मागणी केल्याप्रमाणे मनाई हुकुम न दिल्यास प्रतिवादीचे न भरुन निघणारे नुकसान होईल असे वादी सिध्द करतात काय ? | ... नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

मुददा क्र.१ ते ३ करिताः-

५. सर्वप्रथम हे नमूद करणे आवश्यक आहे की, तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज निकाली काढत असताना सकृतदर्शनी केस दाखविणारा पुरावा पाहणे आवश्यक आहे. तसेच मनाई हुकूमाची मागणी करणारी व्यक्ती ही स्वच्छ हाताने व स्वच्छ हेतूने आली आहे काय तसेच त्याने जागृतपणे आपल्या हक्काचे रक्षण करण्यासाठी योग्य वेळेत अर्ज दाखल केला आहे काय हे देखील पाहणे आवश्यक आहे.

६. प्रतिवादीने सकृतदर्शनी त्यांच्या हक्कात केस आहे हे सिध्द करण्याकरीता दावा मिळकतीचा सातबारा उतारा तसेच अन्य कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, एकत्र कुटुंबाच्या गरजेसाठी रावसाहेब यांनी सदरची मिळकत विक्री करण्याचा करार केला हे दाखविणारा कोणताही पुरावा वादीने अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादी नं. १ ते ४ हे सदर कराराला पक्षकार नाहीत त्यामुळे सदरचा करार हा त्यांच्यावर बंधनकारक नाही. प्रतिवादी नं. १,३ व ४ यांची सदर कराराला संमती आहे हे दाखविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. भारतीय करार कायदा कलम १७ व १९ नुसार सदरचा करार हा बाधीत होतो. सदरची जमीन केवळ करण्यासाठी दिल्याचे करारात नमुद केले आहे. सदरचा व्यवहार हा केवळ व्याजाने रक्कम दिल्याचा आहे व जमीन विक्री करण्याच्या उद्देशाने करार केलेला नाही. सदरचा करार हा नोंदणीकृत नाही तसेच त्यास पुरेसा मुद्रांक देखील लावलेला नाही. या दोन्ही कारणावरुन करार पुराव्यामध्ये वाचता येणार नाही. दावा

मिळकत ही प्रतिवादींच्याच ताब्यात असून त्यास वादी हरकत अडथळा करत आहेत त्यामुळे प्रतिवादी यांच्या हक्कात मनाई हुकुम देण्यात यावा.

७. याउलट वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दावा मिळकतीवर कराराच्या आधारे वादीचा ताबा असून तो सिध्द करण्याकरीता वादीने कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे ज्यामध्ये दि. २५/०७/२००६ ते दि. ३०/०३/२००६ दरम्यान मयत रावसाहेब पाटील यांनी वादीच्या हक्कात करुन दिलेले खरेदी करारपत्र दाखल केले आहे. दिनांक २५/०७/२०१० च्या करारामध्ये दावा मिळकतीची किंमत रु. ९ लाख इतकी नमुद केली असून त्यामध्ये १ प्लॉट एक एकराचा व दुसरा प्लॉट २ एकर १७ आर. असल्याचे लिहिले आहे. दुसरा करार हा दि. २७/०५/२०११ चा असून त्यामध्ये दावा मिळकतीची किंमत रु. १० लाख इतकी नमुद केली आहे. सदर सर्व करारासाठी लागणारा मुद्रांक हा प्रतिवादी नं. २ ब्रिजेश पाटील यांनी मयत रावसाहेब यांच्याकरीता खरेदी केल्याचे दिसत आहे. त्यानंतर दिनांक ३०/०४/२०११ रोजीचा करार केला असून त्यावर साक्षीदार म्हणून वादीचा मुलगा अमोल पाटील व प्रतिवादी नं.२ ब्रिजेश यांची सही आहे. त्यानंतरचा करार हा दि. २४/०५/२०१३ रोजी केल्याचे दिसत आहे. त्या करारात सुरुवातीला लिहिलेली तारीख १५/१०/२०१२ ही खोडली असून त्याठिकाणी दि. २४/०५/२०१३ अशी तारीख लिहिल्याचे दिसत आहे. त्यानंतर दि. ३०/०३/२०१४ रोजी करार करुन दि. १/९/२०१४ पूर्वी खरेदीखत पूर्ण करुन देण्यात त्यात नमुद केले आहे.

८. सदर सर्व करारात दावा मिळकतीचा ताबा वादींना दिल्याचे नमुद केलेले आहे. दावा मिळकत प्रत्यक्ष आपल्या ताब्यात आहे हे दाखविण्याकरीता वादीने उसबीलाच्या पावत्या अभिलेखावर दाखल केल्या आहेत ज्यामध्ये मौजे हेरवाड येथील गट नं. ५५ मधून सन २०१३-१४ पासून ते २०१८-१९ पर्यत

वादीच्या नांवे उस गेल्याचे दिसत आहे. सदर गटातील उस दरम्यानच्या काळात प्रतिवादींच्या नांवे गेला हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादींनी दाखल केलेला नाही. प्रतिवादींच्या कथनानुसार त्यांच्या नांवे सोसायटीचे व बॅकेचे कर्ज होते व उसबीलाच्या रकमेतून ते कर्ज कपात करुन घेतले जाणार होते त्यामुळे त्यांनी स्वतःच्या नावावर उस न पाठवता वादीसोबत चांगले संबंध असल्यामुळे वादीच्या नांवे उस पाठविलेला होता. मात्र त्यांच्या सदर कथनाच्या समर्थनार्थ प्रतिवादींनी कोणताही पुरावा आणलेला नाही.

९. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता दावा मिळकत प्रतिवादींच्या ताब्यात आहे हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दिसत नाही. उलट अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दावा मिळकत ही वादींच्या ताब्यात असून दावा मिळकतीतील उस हा गळपासाठी वादींच्याच नांवे कारखान्यास पाठविलेला आहे. प्रतिवादींनी देखील त्यांच्या कैफियतमध्ये वादींच्या नांवे उस पाठविल्याचे मान्य केले आहे मात्र त्यांच्या मते सदरचा उस त्यांनीच पिकवला होता परंतू केवळ सोसायटीचे कर्ज उसबिलातून कपात होवू नये म्हणून वादीच्या नावे तो घातलेला होता. प्रतिवादींच्या सदर कथनाच्या पुष्ठयर्थ कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही त्यामुळे त्यांचे कथन हे पटण्यासारखे नाही.

१०. प्रतिवादीच्या अर्जाचा विचार करता दावा मिळकत प्रत्यक्षात प्रतिवादींच्या ताब्यात आहे असे दाखविणारा कोणताही पुरावा प्रतिवादींनी हजर केला नाही. त्यांच्याच कथनानुसार दावा मिळकतीतील उस वादीच्या नांवे गाळपासाठी पाठविण्यात आलेला होता. प्रतिवादीच्या दरम्यान प्रत्यक्षात वाटणी होवून त्याचा ताबा प्रत्येक प्रतिवादीला मिळालेला आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर हजर केलेला नाही.

११. येथे नमुद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादीने प्रस्तुत प्रकरणात प्रतिदावा दाखल केलेला नाही त्यामुळे प्रतिवादी केवळ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १अ नुसार सदर मिळकतीची वादीने कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये अशा प्रकारचा मनाई हुकुम मागणेस पात्र ठरतो. सदर आदेशातील क्लॉज ब व क हे केवळ वादीकरीता आहेत ज्यामध्ये वादी हा त्याच्या ताब्यास प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये असा आदेश मागू शकतो. या कारणावरुनदेखील प्रतिवादी हे मनाई हुकुम मिळणेस पात्र नाहीत. मात्र महत्वाची बाब अशी आहे की, दावा मिळकतीवर प्रतिवादींचा ताबा असल्याचे सकृतदर्शनी दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या ताब्यास वादींनी हरकत अडथळा करु नये असा मनाई हुकुम प्रतिवादीच्या हक्कात देता येणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता अंतरीम मनाई हुकुम पारीत करण्याकरीता ज्या बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे त्या बाबींची पुर्तता प्रतिवादीने केलयाचे दिसत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी हे अर्जात मागणी केलयाप्रमाणे मनाई हुकुम मिळणेस पात्र नाहीत. परिणामी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते

<u>मुददा नं. ४ बाबत -</u>

१२. मुददा नं.१ ते ३ चे उत्तर विचारात घेता मुददा नं. ४ बाबत मी पुढील आदेश पारित करीत आहे.

<u>आ दे श</u>

नि. ३९ वरील प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/-

जयसिंगपूर.
दि. २७.०२.२०२०

(कैलास गं. सावंत)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
<u>जयसिंगपूर</u>.